# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 09.04.2026** **वारः गुरुवार**

---

1. आसाम, केरळम् आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दूचेरीमध्ये आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान
2. 2026 या आर्थिक वर्षात, देशाचा आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 6 दशांश टक्के राहण्याचा रिझर्व्ह बँकेचा अंदाज, रेपो दरात बदल नाही
3. देशांतर्गत विमान कंपन्या आणि विमान प्रवाश्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारतर्फे उपाययोजना  जाहीर आणि
4. सांगलीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेत 19 पदकांसह अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठाला विजेतेपद

**<u>विधानसभा निवडणूक</u>**

आसाम, केरळम् आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दूचेरीमध्ये आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. आज सकाळी 7 वाजता मतदानाला सुरुवात झाली असून ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत चालेल. आसाममध्ये विधानसभेच्या 126 जागांसाठी, केरळममध्ये 140 जागांसाठी तर पुददूचेरी मध्ये 30 जागांसाठी आज एकाच टप्प्यात मतदान होत आहे. शांततेत आणि निपक्ष वातावरणात मतदान व्हाव यासाठी निवडणूक आयोगाने व्यापक सुरक्षा व्यवस्था आणि मतदारांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

दरम्यान, तामिळनाडू विधानसभेच्या एकाच टप्प्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे तसच पश्चिम बंगाल मध्येही पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आणि दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. आसाम, केरळम्, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल तसच केंद्र शासित प्रदेश पुददूचेरी या सर्व ठिकाणी येत्या 4 मे ला मतमोजणी होऊन निकाल लागणार आहेत.

दरम्यान, केरळम मध्ये होणाऱ्या आजच्या निवडणुकीत लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदान कराव, विशेषतः महिला आणि युवकांनी मतदानात जास्त भाग घ्यावा अस आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील आपल्या संदेशात केल आहे.

**<u>गोवा-निवडणूक</u>**

गोव्यातील पोंडा विधानसभा जागेच्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगानं काढलेली अधिसूचना मुंबई उच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवली आहे, त्यामुळे तिथ आज होणारं मतदान रद्द झालं आहे. गोवा विधानसभेचा सध्याचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्यास फक्त एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक असल्यानं पोंडा पोटनिवडणूक घेण आवश्यक नाही असं न्यायालयानं निर्णयात म्हटलं आहे.

**<u>केंद्रीयमंत्री मंडळ निर्णय</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल 2026 च्या खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांसाठी पोषक तत्त्वांवर आधारित अनुदान दरांना मंजुरी दिली. त्यासाठी 41 हजार 533 कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार असल्याचं, माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. जागतिक बाजारपेठेतल्या किमतींच्या चढ-उताराचा फटका शेतकऱ्यांना बसू नये, यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं ते म्हणाले.

**<u>जयशंकर-अमिराती</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून मॉरिशस आणि संयुक्त अरब अमिराती या देशांच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. पहिल्या टप्प्यात मॉरिशसमध्ये 9व्या भारतीय सागर परिषदेत ते सहभागी होणार असून तिथ बीजभाषण करणार आहेत. तसच ते मॉरिशसच्या नेत्यांशी संवाद साधून द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतील. दुसऱ्या टप्प्यात एस जयशंकर संयुक्त अरब अमिरातीच्या भेटीवर जाणार असून तिथ ते व्यापक द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारी वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने चर्चा करतील.

**अणू कार्यक्रम**

तामिळनाडूमधील कलपक्कम इथल्या अणुऊर्जा प्रकल्पात प्रोटो टाइप फास्ट ब्रिडर रियाक्टरमधील जटिलता यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय परमाणु ऊर्जा एजन्सीचे महानिर्देशक राफेल मारियानो ग्रॉसी यांनी भारताच कौतुक केल आहे. भारताच्या स्वदेशी अणूऊर्जा कार्यक्रमातील ही ऐतिहासिक घटना असून, इंधन स्थिरता आणि भविष्यातील भारताच्या अणुऊर्जा प्रगतीच्या दिशेने टाकलेल हे महत्वाच पाऊल आहे अस ग्रॉसी यांनी आपल्या समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हंटल आहे तसच या यशाबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच अभिनंदन केल आहे .

**रिझर्व्ह बँक**

रिझर्व बँकेच्या पतधोरण समितीच्या 2026-27 या आर्थिक वर्षातील पहिल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी काल घोषणा केली. रिझर्व बँकेनं रेपोदरात कोणताही बदल न करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला असून तो पूर्वीइतकाच म्हणजे पाच पूर्णांक 25 टक्के राहणार आहे. 2026 या आर्थिक वर्षात, आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 6 दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून 2027 या वर्षात तो 6 पूर्णांक 8 दशांश राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर 4 पूर्णांक 6 दशांश टक्के असेल, असाही रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. जागतिक बाजारातल्या कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे, महागाई वाढण्याची शक्यता मल्होत्रा यांनी व्यक्त केली.

**देशांतर्गत विमान कंपन्या सवलत**

देशांतर्गत विमान कंपन्यांवरील कार्यचालन खर्चाचा भार कमी व्हावा आणि प्रवाशांना परवडणारा विमान प्रवास करता यावा, या उद्देशाने देशांतर्गत विमान कंपन्यांसाठी दिलासा देणाऱ्या काही उपाययोजना काल केंद्र सरकारने जाहीर केल्या. केंद्रीय नागरी विमान वाहातूक मंत्री राम मोहन नायडू यांनी दिलेल्या माहितीनुसार, यामध्ये विमान लँडिंग आणि पार्किंग शुल्कामध्ये 25 टक्के कपात करण्यात आली आहे. ही कपात तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. विमानतळ आर्थिक नियामक प्राधिकरणाला याविषयीचे निर्देश जारी करण्यात आले आहेत. देशभरातील लहान विमानतळांनाही हा निर्णय लागू होणार आहे. जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या अस्थिर परिस्थितीमुळे हवाई इंधनाच्या दरात झालेल्या दरवाढीचा परिणाम हवाई वाहातुकीवर झाला होता. या निर्णयामुळे तीन महिन्यांच्या कालावधीत अंदाजे 400 कोटी रुपयांची बचत होण्याचा अंदाज आहे. प्रवाशांना परवडणारी सेवा आणि सोय सुनिश्चित करतानाच विमान वाहतूक क्षेत्रात स्थिरता राखण्याला सरकारचे प्राधान्य असल्याचे नायडू म्हणाले.

**भारत सीओपी**

जागतिक हवामान बदलाविषयी कार्यरत असलेल्या संयुक्त राष्ट्र हवामान बदल आराखडा करारातील सदस्य देशांच्या 33 व्या परिषदेचे म्हणजेच कॉप-33 चे यजमानपद भूषवण्याचा प्रस्ताव भारताने मागे घेतला आहे. आशिया पॅसिफिक गटाला हा निर्णय कळवण्यात आला आहे. संयुक्त अरब अमिरातीमध्ये 2023 मध्ये झालेल्या 28 व्या परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हा प्रस्ताव मांडला होता.

**कच्छ शौर्य दिवस**

गुजरातमधील कच्छ जिल्ह्यात सीमावर्ती भागातील सरदार पोस्ट इथ आज शौर्य दिवस साजरा करण्यात येणार आहे. यावेळी सीमा सुरक्षा दलातील वरिष्ठ अधिकारी आणि जवान, गार्ड ऑफ ऑनर देऊन शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करणार

आहेत. 1965 मध्ये झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात भारतीय जवानांनी दाखवलेल्या अतुलनीय साहस आणि शौर्याबद्दल दरवर्षी 9 एप्रिल या दिवशी  शौर्य दिवस साजरा करण्यात येतो.

**लेबनान-इस्रायल**

अमेरिका-इराण युद्ध विराम लागू झाल्यानंतर इस्रायलने कालपासून लेबनानमध्ये जोरदार हल्ले सुरू केले. या हल्ल्यात कालच्या एकाच दिवसात 182 लोकांचा मृत्यू झाल्याचं लेबनानच्या आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. इस्रायल-हिजबुल्ला युद्धात एकाच दिवसात झालेली सर्वाधिक जीवितहानी आहे. संघर्ष विराम करारात लेबनानचा समावेश असणे अपेक्षित असल्याचा दावा इराणच्या अधिकाऱ्यांनी केला आहे, मात्र तसा समावेश नसल्याचा अमेरिका आणि इस्रायलनं ठाम पुनरुच्चार केला आहे.

**कयाकींग-कनोईंग-सांगली**

शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठ महासंघ यांच्याद्वारे महाराष्ट्रात सांगली इथं कृष्णा नदीत पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेत 19 पदकांसह अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठानं विजेतेपद मिळवलं. स्पर्धेत चुरशीची लढत देणाऱ्या मोहालीच्या चंदीगड विद्यापीठानं उपविजेतेपद मिळविल, तर  चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाला तिसऱ्या स्थानी समाधान मानावं लागलं. त्यांना अनुक्रमे 18 आणि 15 पदकं मिळाली. सांगलीच्या रॉयल कृष्णा बोट क्लबवर या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ काल खासदार विशाल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार...